| MHND270000282023 | म.सं.कौ.हिं. अर्ज क्र.१/२०२३ |
| --- | --- |
| | शहेनाज व ईतर विरुध्द शेख मुबीन व ईतर |

## निशाणी क्र.५ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज कलम २३ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम–२००५ या कायदा अंतर्गत अंतरीम आदेश मिळण्याकरिता करण्यात आला आहे.

२. अर्ज वाचला. तसेच गैरअर्जदार यांनी नि.क्र.१५ वर सादर केलेले म्हणणे वाचले. अर्जदारांच्या व गैरअर्जदारांच्या वकिलांचे म्हणणे ऐकले.

३. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा तिचा पती आहे व ईतर गैरअर्जदार हे तिच्या पतीचे नातेवाईक आहेत. त्यांनी सर्वांनी मिळून तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे व तिला शारिरीक व मानसीक त्रास दिल्यामुळे ती मुलांसह माहेरी राहात आहे. त्यांनी तिची कोणतीही सोय केली नाही. पर्यायाने तिला प्रस्तुतची कार्यवाही दाखल करणे भाग पडले. तिला उदरनिर्वाहसाठी कोणतेही साधन नाही. ती माहेरी असल्या पासून तिच्या पतीने तिच्या पालनपोषणाची कोणतीही सोय केली नाही. तिच्या माहेरची आर्थीक परिस्थितीत अतिशय बिकट आहे. याउलट तिचा पती फुलांचा व्यवसाय करतो व महिन्याकाठी तीस ते चाळीस हजार रुपये कमावितो. सबब, उदरनिर्वाहासाठी त्यांना दरमहा पंधरा हजार रुपये पोटगी व निवासासाठी घर भाडे पोटी तीन हजार रुपये देवविण्याचे अंतरीम आदेश पारीत करावे.

४. सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचार कायदयाखाली संरक्षण अधिकारी यांच्यामर्फत शपथेवर दाखल केलेला आहे. संरक्षण अधिकारी यांनी जोडलेल्या अहवालावरुन प्रथमदर्शनी असे अभिप्रेत होते की, अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे. त्यामुळेच तिने संरक्षण अधिका–यामार्फत अर्ज सादर केलेला आहे.

५. गैरअर्जदार यांनी अर्जदारांचे सर्व म्हणणे नाकारलेले आहेत व असे सांगितले आहे की, अर्जदार ही स्वतःहुन त्यांना सोडून गेलेली आहे. तसेच तिने खोटेपणाने सदरची कार्यवाही त्यांच्याविरुध्द केलेली आहे. त्यांनी तिच्यावर कोणताही कौटुंबिक हिंसाचार केलेला नाही व तिला कधीही घरातुन हाकलुन दिलेले नाही. त्यामुळे तिला पोटगी मागण्याचा अधिकार नाही. तो आजही अर्जदार हिला नांदवावयास तयार आहे. त्याच्याकडे उत्पन्नाचे साधन नाही व तो फुलांचा व्यवसाय करीत नाही. त्याचे असेही म्हणणे आहे की, तो गंवडी काम करतो व त्यामधुन महिन्याकाठी जेमतेम पाच ते सहा हजार रुपये कमवितो. त्याच्याकडे कोणतीही जंगम व स्थावर मालमत्ता नाही व त्याच्यावर त्याच्या आईच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे.

६. अर्जदाराच्या कथनास गैरअर्जदार क्र.१ यांनी विरोध दर्शविलेला असला तरी त्यांच्यामधील नातेसंबंध मान्य केलेले आहेत. उभयतांनी केलेल्या एकमेकांविरुध्दच्या परस्पर विधानांना शाबिती होण्याकरिता वेळ लागणार आहे. गैरअर्जदार यांनी नातेसंबंध मान्य केलेले असल्यामुळे पती या नात्याने तो अर्जदाराचे पालनपोषण करण्यासाठी नैतिकपणे जबाबदार ठरतो. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गैरअर्जदार यांनी नि.क्र.१६ वर त्यांच्या मिळकती बाबत व खर्चा बाबतचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदार यांनी नि.क्र.२४ वर तिचे मिळकती व खर्चा बाबतचे शपथपत्र दाखल केले. नि.क्र.१६ वर गैरअर्जदार यांनी तो रोज मजुरी करुन महिन्याला सहा हजार रुपये कमावितो असे लिहिलेले आहे व त्याचा खर्च त्याने चार

हाजार सातशे रुपये दाखविलेला आहे. याउलट अर्जदार हिने तिच्या शपथपत्रामध्ये तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे नमूद केले आहे व तिचा व तिच्या मुलांच्या पालनपोषणाचा खर्च दरमहा सोळा हजार रुपये एवढा दाखविलेला आहे. अर्जदार हिने असे कथन केलेले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा फुलांचा व्यवसाय करतो व त्यामधुन त्याला दरमहा तीस ते चाळीस हजार रुपये मिळतात. परंतु त्या बाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदाराने सादर केलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा फुलांच्या व्यवसायातुन पैसे कमावितो या बाबत सकृत दर्शनी कोणताही पुरावा उपलब्ध नाही. तरी परंतु गैरअर्जदार क्र.१ याने स्वतःच तो रोज मजुरीचे काम करतो असे मान्य केलेले आहे व त्याचे उत्पन्न साधारणपणे सहा हजार रुपये दाखविलेले आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा रोजमजुरी करतो असे गृहीत धरुन व रोज मजुरीचे दर लक्षात घेता निश्चितपणे महिन्याकाठी सात ते आठ हजार रुपये कमवित असावा असा निष्कर्ष काढण्यात येतो. सबब, गैरअर्जदार क्र.१ याचे गृहीत धरण्यात आलेले उत्पन्न, त्याच्यावर असलेल्या जबाबदा-या, तसेच अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाच्या आवश्यक रकमेचा विचार करता तो निश्चीतपणे तिला दरमहा दोन हजार रुपये व घरभाडे करिता एक हजार रुपये देवू शकतो असे वाटते. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुत अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ ते ३ यांना सदरचा अर्ज दाखल तारखे पासून एकत्रीतपणे दरमहा २,०००/- रूपये (दोन हजार रूपये फक्त) अंतरीम पोटगी दयावी. |
| ३ | गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारांना घर भाडे पोटी एकत्रीतपणे दरमहा रुपये १,०००/- (एक हजार रूपये फक्त) एवढी रक्कम दयावी. |
| ४ | गैरअर्जदार यांनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार कोणत्याही प्रकारे |

| | |
|---|---|
| | करु नये असा तात्पुरता संरक्षणात्मक आदेश पारीत करण्यात येतो. |
| ५ | आदेशाची सत्यप्रत दोन्ही पक्षकारांना विनामूल्य द्यावी. |
| ६ | तसेच आदेशाची सत्यप्रत पोलीस स्टेशन, मुदखेड, ता.मुदखेड व संरक्षण अधिकारी, मुदखेड, ता.मुदखेड यांना त्वरीत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात यावी. |

स्वाक्षरीत/-

मुदखेड. **( एस.बी.ढेंबरे)**

दि. २०/११/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी

मुदखेड, जि. नांदेड.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File judgment are same word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | Ashok A. Totre |
| Court Name | : | J.M.F.C. Mudkhed |
| Date | : | 20-11-2023 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 21-11-2023 |
| Judgment Uploaded on | : | 22-11-2023 |